महाराष्ट्र स्वंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक स्वयंअ-२०१३/(८५/१३) (II) /माशि-१**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४०००३२
दिनांक : ५ ऑक्टोंबर, २०१३

**संदर्भ :-**

१) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक - १, दिनांक ०४ जानेवारी, २०१३.
२) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक - ६, दिनांक १९ जानेवारी, २०१३.
३) शासन निर्णय क्रमांक पाशातु - १११२ / (२५८/२०१२) / प्राशि - ३, दिनांक १३ फेब्रुवारी, २०१३
४) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक - ५, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१३.
५) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक - ५७, ५८ व ५९, दिनांक २० एप्रिल, २०१३.
६) शासन निर्णय क्रमांक स्वयंअ - २०१३ / (८५/१३)/माशि - १, दिनांक १५ जून, २०१३
७) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक -२४, दिनांक २ जुलै, २०१३

**प्रस्तावना :-**

राज्यामध्ये दर्जेदार शिक्षण देण्यासाठी व शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाकरीता राज्य शासनाने कायम विनाअनुदानित तत्वावर नवीन प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना मान्यता देणे व विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी " **महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२** " पारित केला आहे. या अधिनियमाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष सन २०१३-१४ पासून करण्यात आली आहे. सदर अधिनियमाच्या अनुषंगाने नवीन शाळांना मान्यता देणे, विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणे इत्यादी साठी फेब्रुवारी, २०१३ मध्ये अर्ज मागविण्यात आले होते. प्राप्त झालेल्या ७,१०८ अर्जांची छाननी करुन दिनांक १५ मे, २०१३ रोजी २,४१७ प्रस्ताव पात्र करण्यात आले होते.

२. शैक्षणिक वर्ष सन २०१३-१४ साठी पात्र प्रस्तावांची छाननी करीत असतांना निदर्शनांस आलेल्या त्रुटी व प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी आलेल्या अडचणी यांचा विचार करता उक्त अधिनियमांच्या काही कलमांमधील तरतुदींमध्ये सुधारणा करण्यासंदर्भातील प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेस्तव दिनांक ०५

Principal
Vidya Pratishthan's
Nanded City Public School
Nanded City Dist.Pune

Principal
Vidya Pratishthan's
Nanded City Public School
Nanded City, Dist.Pune

जून, २०१३ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. मंत्रिमंडळाच्या सदर बैठकीत विभागाच्या प्रस्तावास मान्यता प्राप्त झाल्यानुसार विधी व न्याय विभागाच्या सहमतीनंतर त्या संदर्भातील अध्यादेश मा. राज्यपालांच्या मान्यतेनंतर दिनांक ०२ जूलै, २०१३ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रख्यावित करण्यात आला आहे.

३. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ या अधिनियमातील तरतुदीनुसार सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरीता ज्या शैक्षणिक संस्थांनी नवीन शाळांना मान्यता देणे व विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी अर्ज दाखल केले होते. परंतू, अधिनियमातील तरतूदींच्या पुर्ततेअभावी त्यांचे प्रस्ताव अपात्र ठरले होते. अशा संस्थांच्या बाबतीत उपरोक्त अध्यादेशातील सुधारित तरतुदींची पूर्तता करुन प्राप्त झालेल्या प्रस्तावांच्या संदर्भात छाननी समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने स्वयंस्पष्ट अभिप्राय नोंदवून त्याबाबतचे सुधारित प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्यानुसार प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी केली असता ८२८ एवढे प्रस्ताव पात्र करण्यात आलेले आहेत. या पात्र प्रस्तावांवर पुढील कार्यवाही कोणत्या पध्दतीने करावी ही बाब शासनाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन शासनाने पुढील निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय:-</u>

वरील पार्श्वभूमीवर सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरीता नवीन शाळा सुरु करण्यास किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्याकरीता छाननी समितीत्यांकडून कलम ६ (१) अनुसार प्राप्त झालेल्या जिल्हानिहाय अहवालाच्या अनुषंगाने उक्त अधिनियमातील विविध तरतूदी तसेच दिनांक ०२ जूलै, २०१३ च्या अध्यादेशामधील तरतूदींच्या अनुषंगाने महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अन्वये सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरीता प्राप्त झालेल्या प्रस्तावांपैकी पुढीलप्रमाणे ८२८ प्रस्ताव पात्र म्हणून जाहीर करण्यात येत आहेत.

२) शाळा दर्जावाढीच्या १९१ पात्र शाळांना शैक्षणिक वर्ष सन २०१३-१४ या वर्षापासून वर्ग सुरु करण्याबाबची परवानगी देण्यात येत आहे.

३) नवीन शाळांचे प्रस्ताव - वरीलप्रमाणे पात्र ठरलेल्या ६३७ नवीन शाळांना याद्वारे परवानगी देण्यात येत आहे. प्रत्येक शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतूदींची पुर्तता करणे आवश्यक आहे. (अल्पसंख्याक विना अनुदानित शाळा वगळून) त्याप्रमाणे उपरोक्त संबंधित पात्र ठरलेल्या शाळांच्या व्यवस्थापकांनी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतूदींची पुर्तता करुन शाळा प्रथम मान्यतेसाठी संबंधित सक्षम अधिका-यांकडे एक महिन्याच्या कालावधीत अर्ज करावेत. संबंधित अधिका-यांनी बालकांचा मोफत व सक्तीच्या



Principal
Vidya Pratishthan's
Nanded City Public School
Nanded City, Dist.Pune

Principal
Vidya Pratishthan's
Nanded City Public School
Nanded City, Dist.Pune

शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतूदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी (अल्पसंख्याक विना अनुदानित शाळा वगळून) व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

४) पूर्व प्राथमिक शाळांना स्वतंत्र शाळा म्हणून मंजूरी देण्यात आलेली नसून त्या प्राथमिक शाळंला संलग्न म्हणून मंजूर करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार या अंतर्गत सुरु होणा-या शाळांना इयत्ता पहिली पासून परवानगी देण्यात येईल.

५) संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादीमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल. या अधिनियमामधील तरतूदींनुसार शाळा स्थापन करण्यास किंवा तिचा दर्जावाढ करण्याकरीता दिलेली परवानगी ही ज्या शैक्षणिक वर्षाकरीता देण्यात आलेली असेल त्या शैक्षणिक वर्षाकरीता असेल आणि अशी परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.

६) सोबतच्या विवरणपत्रात परवानगी देण्यात आलेल्या नवीन / दर्जावाढ शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील (अल्पसंख्यांक विना अनुदानित शाळा वगळून) त्याचप्रमाणे महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ यातील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक आहे.

७) सोबतच्या विवरणपत्रामध्ये दर्शविलेल्या जिल्हानिहाय तपशीलानुसार नवीन शाळा स्थापन करण्यास किंवा विद्यमान शाळेच्या दर्जावाढ करण्यास पात्र ठरलेल्या त्याचप्रमाणे अपात्र ठरलेल्या प्रस्तावांच्या तपशीलासह संबंधित जिल्हयाच्या छाननी समितीच्या सदस्य सचिवांकडून संबंधित अर्जदाराला वैयक्तिकरीत्या कळविणे आवश्यक राहील व त्याची पोच शासन दप्तरी ठेवण्यात यावी.

८) सोबतच्या विवरणपत्रात परवानगी देण्यात आलेल्या नवीन / दर्जावाढ शाळांबाबत जिल्हानिहाय DISE Data मध्ये माहिती भरताना, स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद / क्रमांक घेणे आवश्यक राहील. याबाबतची पुढील कार्यवाही राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्यामार्फत करण्यात यावी. त्याचप्रमाणे सर्व संबंधितांच्या माहितीकरीता शाळेबाहेर स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा असे जाहीर फलकावर दर्शविणे आवश्यक राहील.

Principal
Vidya Pratishthan's
Nanded City Public School
Nanded City, Dist.Pune

Principal
Vidya Pratishthan's
Nanded City Public School
Nanded City, Dist.Pune

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३१००७११३७५८९६२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Prakash Krishnrao Thube

Digitally signed by Prakash Krishnrao Thube
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Prakash Krishnrao Thube
Date: 2013.10.18 16:26:50 +05'30'

(प्रकाश ठुबे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
३. राज्य प्रकल्प संचालक,महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषद,मुंबई
४. महासंचालक माहिती व जनसंपर्क संचालनालय , मंत्रालय, मुंबई
५. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
६. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषदा,
७. सर्व शिक्षण निरिक्षक, बृहन्मुंबई(पश्चिम/उत्तर/दक्षिण)
८. मा.मंत्री, (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव,
९. मा.राज्यमंत्री, (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव,
१०. मा.अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, यांचे स्वीय सहाय्यक
११. शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई
१२. उपसचिव, अर्थसंकल्प शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. सर्व सह / उपसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. निवडनस्तीमाशि-१

Principal
Vidya Pratishthan's
Nanded City Public School
Nanded City, Dist.Pune

Principal
Vidya Pratishthan's
Nanded City Public School
Nanded City, Dist.Pune

महाराष्ट्र शासन

विवरणपत्र- १

## महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत कलम ७(१) अन्वये नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी सन २०१२-२०१३ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी दिलेल्या शाळांच्या नावाची यादी

शासन निर्णय क्र.-स्वयंअ २०१३/(८५/१३)(II)/मशि-१, दिनांक :- ५ अक्टोबर २०१३ चे सहपत्र

| अनु. क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थाचे नाव | प्रस्तावित शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | नवीन शाळा/ दर्जावाढ | छाननी समितीची शिफारस व त्या बाबत प्राप्त झालेल्या हरकती / सूचना / आक्षेप विचारात घेता शासनाचा अंतिम निर्णय | शाळेचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | उत्तर मुंबई | गोवंडी एज्युकेशन सोसायटी, गोवंडी स्टेशन रोड, गोवंडी (पू), मुंबई ४०० ०८८ | श्री. हशू अडवाणी मेमोरिअल स्कूल, भक्त कवी शिवाजी भाई देवशी मार्ग, गोवंडी स्टेशन रोड, गोवंडी (पू) मु. ८८ | इंग्रजी (S.S.C) | नवीन | पात्र | प्राथमिक |
| २ | उत्तर मुंबई | शर्मा शिक्षण संस्था, नेताजी नगर, खाडी नं. ३, जरीमरी कुर्ला (प), मुंबई ७२ | शर्मा इंग्रजी हायस्कूल, नेताजी नगर, खाडी नं. ३, जरीमरी, कुर्ला (प), मुंबई ७२ | इंग्रजी (S.S.C) | दर्जावाढ | पात्र | माध्यमिक |
| ३ | मुंबई पश्चिम | प्रियंका चॅरिटेबल ट्रस्ट | डॉ. एच. बी मिश्रा ज्यू. कॉलेज ऑफ आर्टस सुधीर निवास, एस एन दुबे रोड, रावलपाडा, दहिसर पूर्व मुंबई ६८ | इंग्रजी | दर्जावाढ | पात्र | उच्च माधामिक |
| ४ | मुंबई पश्चिम | जोगेश्वरी एज्युकेशन सोसायटी, जोगेश्वरी (पू), मुंबई | जोगेश्वरी एज्युकेशन सांसायटीचे कनिष्ठ रात्र महाविद्यालय, जोगेश्वरी (पू), मुंबई | इंग्रजी | नवीन | पात्र | उच्च माधामिक |
| ५ | मुंबई पश्चिम | .अल मुस्तफा एज्युकेशन अॅड वेल्फेअर सोसायटी | ए एम इंग्लिश स्कूल, गेट नं.७ , मालवणी मालाड पश्चिम मुंबई ४०००९५ | इंग्रजी | दर्जावाढ | पात्र | प्राथमिक |
| ६ | मुंबई पश्चिम | बी. आर. एज्युकेशनल ट्रस्ट | सर जे आर हायस्कूल,जोसेफ पटेल रोड मालवणी गेट नं . ८ , मालवणी , मालाड पश्चिम मुंबई ४०००९५ | इंग्रजी | दर्जावाढ | पात्र | प्राथमिक |
| ७ | मुंबई पश्चिम | कला विद्यालय ट्रस्ट | श्रीमती के बी पाटील इंटरनॅशनल स्कूल, जोगेश्वरी पूर्व मुंबई -६० | इंग्रजी | नवीन | पात्र | प्राथमिक |
| ८ | मुंबई पश्चिम | सांताक्रुझ शिक्षण संस्था | इंग्रजी कुडोस किडस सें.कडरी स्कूल, टी पी एस ११ वा रस्ता, व्ही एन देसाई हॉस्पिटल जवळ, सांताक्रुझ पूर्व मुंबई ४०००५५ | इंग्रजी | दर्जावाढ | पात्र | माध्यमिक |

Principal
Vidya Pratishthan's
Nanded City Public School
Nanded City, Dist.Pune

Principal
Vidya Pratishthan's
Nanded City Public School
Nanded City, Dist.Pune

| शासन निर्णय क्र.-स्वयंअ २०१३/(८५/१३)(II)/मशि-१, दिनांक :- ५ अक्टोबर २०१३ चे सहपत्र | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अनु. क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थाचे नाव | प्रस्तावित शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | नवीन शाळा/ दर्जावाढ | छाननी समितीची शिफारस व त्या बाबत प्राप्त झालेल्या हरकती / सूचना / आक्षेप विचारात घेता शासनाचा अंतिम निर्णय | शाळेचा प्रकार |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १९३ | पुणे | जय वाघजाई देवी संस्था, पिरंगुट, ता.मुळशी | संस्कार प्रायमरी स्कूल, पिरंगुट, ता.मुळशी | इंग्रजी | नवीन | पात्र | प्राथमिक |
| १९४ | पुणे | डी.व्ही. प्रतिष्ठान शिक्रापुर ता. शिरुर जि.पुणे. | गुरुकुल पब्लिक स्कुल शिक्रापुर ता. शिरुर जि.पुणे. | इंग्रजी | नवीन | पात्र | प्राथमिक |
| १९५ | पुणे | कारेश्वर शैक्षणिक संस्था कारेगाव ता. शिरुर जि.पुणे. | कारेश्वर इंग्लिश मेडियम स्कुल, कारेगाव ता. शिरुर जि.पुणे | इंग्रजी | नवीन | पात्र | प्राथमिक |
| १९६ | पुणे | श्री स्वामी समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ राजगुरुनगर ता. खेड जि.पुणे. | आर्याज् इंग्रजी स्कुल पाबळ ता. शिरुर जि.पुणे. | इंग्रजी | नवीन | पात्र | प्राथमिक |
| १९७ | पुणे | शहाजीराव पाटील विकास प्रतिष्ठान बावडा ता. इंदापूर जि.पुणे. | एस.बी.पाटिल पब्लिक स्कुल बावडा ता. इंदापूर जि.पुणेर | इंग्रजी | नवीन | पात्र | प्राथमिक |
| १९८ | पुणे | कै. मुथुबाई बापुराव गावडे शिक्षण संस्था ता. बारामती जि.पुणे. | आदर्श इंग्लिश स्कुल पारवडी ता. बारामती जि.पुणे. | इंग्रजी | नवीन | पात्र | प्राथमिक |
| १९९ | पुणे | एस.व्ही. चॅरिटेबल फाऊंडेशन, गट नं.१६९, गणेश नगर, तळवडे रोड, पुणे | सरस्वती विश्व विद्यालय नॅशनल स्कूल, गट नं.१६९, गणेश नगर, तळवडे रोड, पुणे | इंग्रजी | नवीन | पात्र | प्राथमिक |
| २०० | पुणे | मातृमंदीर विश्वस्त संस्था, निगडी, पुणे | श्री. दादा महाराज नाटेकर पंचकोशाधारित विद्यालय, सोनवणेवस्ती, चिखली, | मराठी | नवीन | पात्र | प्राथमिक |
| २०१ | पुणे | कै. दिनकरराव जेधे पाटील प्रतिष्ठाण, राधाकृष्णनगर, भोसरी | प्रिती इंग्लिश स्कूल, मोशी, गायकवाड वस्ती, ता.हवेली, जि.पुणे | इंग्रजी | नवीन | पात्र | प्राथमिक |
| २०२ | पुणे | कोंद्रे एज्युकेशन सोसायटी, मांजरी फार्म, ता.हवेली | श्री श्री अॅकेडमी, मांजरी फार्म, मांजरी ग्रीन्सजवळ, ता.हवेली | इंग्रजी | नवीन | पात्र | प्राथमिक |
| २०३ | पुणे | विद्या प्रतिष्ठान, विद्यानगरी, ता. बारामती, जि.पुणे | विद्या प्रतिष्ठानचे, नांदेड सिटी पब्लीक स्कूल, नांदेड सिटी, नांदेड, ता.हवेली | इंग्रजी | नवीन | पात्र | प्राथमिक |
| २०४ | पुणे | सिता-रंग चॅरिटेबल सोसायटी, बोरी बुद्रुक, ता.जुन्नर | स्व. संजय शांताराम शिंदे इंग्लिश मिडीयम स्कूल, बोरी बुद्रुक, ता.जुन्नर | इंग्रजी | नवीन | पात्र | प्राथमिक |
| २०५ | पुणे | श्रीनिवास ग्राम विकास मंडळ आलेगाव पागा ता. शिरुर जि.पुणे. | अनिल दादा मधुकर कांबळे इंग्लिश मेडियम स्कुल आलेगाव पागा ता.शिरुर जि.पुणे. | इंग्रजी | नवीन | पात्र | प्राथमिक |

Principal
Vidya Pratishthan's
Nanded City Public School
Nanded City, Dist.Pune

Principal
Vidya Pratishthan's
Nanded City Public School
Nanded City, Dist.Pune

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता दिलेल्या परवानगीबाबत
विद्या प्रतिष्ठाण, ता. बारामती, जि.पुणे संचलित विद्या प्रतिष्ठाणचे नांदेड सिटी पब्लिक स्कूल, नांदेड सिटी, नांदेड, ता.हवेली, जि. पुणे

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन शुद्धीपत्र क्रमांकः एसएफएस-१०१७/प्र.क्र. ९७/एसएम-२
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक: २४ मार्च, २०१७

वाचा :-

शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. स्वयंअ-२०१३/(८५/१३)(II)/माशि-१
दिनांक ५ ऑक्टोबर, २०१३.

शासन शुद्धीपत्रः-

शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक स्वयंअ-२०१३/(८५/१३)(II)/माशि-१, दिनांक ५.१०.२०१३ सोबतच्या विवरणपत्रामधील अ.क्र. २०३ मधील रकाना क्रमांक-८ मध्ये "प्राथमिक" ऐवजी "प्राथमिक ते उच्च प्राथमिक" असे वाचावे.

२. सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा / दर्जावाढ करण्यास परवानगी देण्याबाबतच्या संदर्भाधीन दिनांक ५.१०.२०१३ च्या शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती जशाच्या तशा सदर शाळेस लागू राहतील.

३. सदर आदेश संबंधित संस्थेस १५ दिवसाच्या आत कळविण्याची जबाबदारी संबंधित शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(संतोष गायकवाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे
३. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
४. शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
५. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
६. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे
७. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे
८. निवडनस्ती (एसएम -२).

Principal
Vidya Pratishthan's
Nanded City Public School
Nanded City, Dist.Pune

Principal
Vidya Pratishthan's
Nanded City Public School
Nanded City, Dist.Pune

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१७/प्र.क्र.१३१/एसएम- २

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक: १३ एप्रिल, २०१७

प्रस्तावना -

१. विद्या प्रतिष्ठान,विद्यानगरी, बारामती, जि पुणे संचलित नांदेड सिटी पब्लिक स्कुल, नांदेड सिटी, सिंहगड रोड, ता. हवेली, जि.पुणे या शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनास सादर झाला होता. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत विद्या प्रतिष्ठान, विद्यानगरी, बारामती, जि पुणे संचलित नांदेड सिटी पब्लिक स्कुल, नांदेड सिटी, सिंहगड रोड, ता. हवेली, जि.पुणे या उच्च प्राथमिक इंग्रजी माध्यमाच्या शाळेस माध्यमिक करिता (इ. ९ वी ते १० वी, आय. सी.एस.ई) सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून दर्जावाढ करण्यास खालील अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे .

२.२ अटी व शर्ती -

(१) सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

(२) संबधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब) व्यवस्थापनास सन २०१६-१७ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्यास शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

क) शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार आय.सी.एस.ई. मंडळाशी संलग्नेतेकरिता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.)

मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस **मान्यता** (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळेने अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) /शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या **संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र** (N.O.C.) मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी **ना-हरकत** (N.O.C.) प्रमाणपत्र देईल.

(३) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळेस i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे **बंधनकारक** राहील

(४) संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच **प्रथम मान्यता** देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(५) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले **माध्यम**, शाळेचे **ठिकाण** इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी **आपोआपच रद्द** समजण्यात येईल.

(६) **यु-डायस डाटा:-** या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढ शाळा** बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,"***स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा***" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी **राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण** परिषद, **मुंबई** यांना **नोडल अधिकारी** म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता " **स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा**" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

३. सदर आदेश संबधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(रा.ग.गुंजाळ)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे
६. शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद (प्राथमिक/माध्यमिक), पुणे
७. निवडनस्ती (एसएम-२)